# संत मतांवर भगवान बुध्दाच्या शिकवणुकीचा प्रभाव

**प्रा. डॉ. प्रमोद देवराज सरदार**

एस. चंद्रा महिला महाविद्यालय आमगाव जि. गोंदिया

---

***सारांश*** :

*इ. स. ६ व्या शतकात भारतात एका नंदनवन युगाची सुरूवात झालेली आपणांस पहावयास मिळते. या युगाचे खरे निर्माते भगवान बुध्द होते. विषमतेच्या विरूध्द समता स्थापन करण्याची सुरूवात या काळात भगवान बुध्दान केली होती. ही शिकवण १ हजार वर्षापर्यत भारतातच नव्हे तर आशिया खंडात पसरलेली आपणांस पहावयास मिळते. १२ व्या शतकानंतर ही शिकवण लयास पावली परंतु ति जिवंत होती हे आपणांस संताच्या विचारावरून पहावयास मिळते. मध्ययुगात बौध्द धम्माचे अस्तित्व नव्हते परंतु जी भगवान बध्दाची शिकवण इ.स. १२ व्या शतकापर्यत संपुर्ण भारतात पसरलेली होती त्याचाच एक परिपाक म्हणजे कुठे ना कुठे तरी ती जिवंत हाती हे आपल्याला पहावयास मिळते. व त्याचा प्रभाव भारतामधील संतावर होतो असे निष्कर्षा अंती आढळुन येते.*

**महत्वपुर्ण शब्द** : भारतामधील संत, संताचे विचार, भगवान बुध्द, भगवान बुध्दाचे विचार

---

**प्रस्तावना** :

बौध्द धर्माचे संस्थापक भगवान बुध्द आहेत. इ. स पूर्व ६ व्या शतकात नेपाळ राज्याच्या सिमेवर कपीलवस्तुजवळ लुम्बीनी उद्यानात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या आई वडीलांनी त्यांचे नांव सिध्दार्थ ठेवले. लहानपणापासुन सिध्दार्थ चिंतन, मनन, शांत, गंभीर होते. त्यांना राजपाट, पत्नी, पुत्र संपत्ती यामध्ये कोणतेही रूची नव्हती. जिवनातील समस्यावर ते  सतत विचार करीत होते. मुलगा अगदी लहानपणापासुन एवढा चिंतन शिल आहे याबाबत वडीलांना चिंता वाटत होती. त्याने आपला गृहस्थाश्रम चांगला करावा म्हणुन वडीलांनी त्यांचे लग्न सुंदर यशोधरा नावाच्या युवतीसोबत लावुन दिले. काही दिवसातच त्यांना पुत्र झाला व पुत्राचे नांव राहुल ठेवण्यात आले. वडीलांनी आपल्या मुलाचे मन राजमहालात रमावे याकरीता तील रूतुत ३ राजमहाल बांधले परंतु सिध्दार्थाचे मन राजवाडयात व आपल्या सुंदर पत्नीत व मुलात संपतीत रमले नाही. शाक्य व कोलीय यांच्यात रोहीणी नदीच्या पाण्यावरून वाद निर्माण झाला व त्यामुळे त्यांनी राजगृहाचा त्याग केला यांलाच महाभिनिष्क्रमण म्हटले जाते. पुढे आपला नवीन मार्ग शोधण्यासाठी त्यांनी आपल्या गुरूच्या माध्यमातुन ध्यानसाधना शिकलेत. व या ध्यानसाधनेतुन त्यांना बुध्दत्वाचा शोध लागला. व लोकांच्या कल्याणाकरीता ४५ वर्ष त्यांनी आपल्या ा शिकवणुवकीचा प्रसार प्रचार केला.

१५ व्या शतकात वैष्णव पंथानी जोर पकडलेला आढळुन येतो. भक्ती मार्गाच्या आंदोलनाने सुध्दा जोर पकडलेला होता. या शतकात संतानी सुध्दा ब्राम्हण व्यवस्थे विरूध्द आंदोलन उभारलेले होते. यामध्ये

प्रमुख संत कबीर यांचा मोलाचा वाटा आढळुन येत आहे. मध्ययुगात जर आपण संताच्या जिवनाचा विचार केला तर गौतम बुध्दाच्या चार आर्य सत्य दु:ख, दु:ख समुदाय, दु:ख निरोध व दु:ख निरोध मार्ग आर्य अष्टांग मार्गापैकी सम्यक दृष्टी, संकल्प, वाचा, कर्म, आजीव, व्यायाम, स्मृती व समाधी आपल्याला पहावयास मिळते. यांचे प्रेरणास्त्रोत, भगवान बुध्द व त्यांची शिक्षा यांचा संताच्या विचारावर प्रभाव दिसतो.

संताच्या वाणीत जनकल्याणाचे विचार होते तसेच बुध्दाच्या वाणीत जनकल्याणाचे विचार होते. संत नामदेव, संत गोरा कुंभार, एकनाथ, ज्ञानेश्वर यांचे विचारावर बौध्द धम्माचा प्रभाव जाणवतो. लामा तारानाथ यांचे असे मत आहे की संत कबीराच्या मृत्युनंतर चांगलराज नावाच्या राजाने बौध्द विहार बांधण्यास सुरू केल्याचे आढळते. कबीराच्या काळात बौध्द धम्म यांचे वर्णन आढळुत येत नाही.उत्तर भारतात बौध्द धम्म जिवंत आढळुन येत नाही. १३३१ मध्ये बर्मा च्या राजाने बुध्द गयेला मंदीराचे जिर्णोध्दार केल्याचे आढळुन येत आहे. १५ व्या शतकात बौध्द भिक्षु तसेच बौध्द गृहस्थ होते. महाराष्ट्रात बौध्द होण्याचे प्रमाण आढळुन येते. कन्हेरीच्या बौध्द गुफातर बौध्द भिक्षु होते याचे प्रमाण आढळुन येते. भारतात बौध्द धम्माचे प्रारूप बदलत गेले त्यातुनच नामदेव, रामानंद कबीर संतांनी निर्गुण भक्ती भावरूप धारण केले.

संत कबीरांनी आपल्या विचारातु पुजारी ची खुप टिका केलेली आढळुन येते. बाहेरील पुजा, स्नान पुजा, मंत्र, वैदीक यज्ञ, होम यावर अविश्वास टाकुन वर्णव्यवस्था तसेच सामाजिक दम्भ यावर विरोध केलेला आढळुन येते. बौध्द विचाराचा काहिना काही प्रभाव आपल्याला आढळुन येतो जसे धार्मिक रूढी, परंपरा, जिवनाची नश्वरता, सुयमपुर्ण जिवन, तृष्णा नष्ट करणे

भगवान बुध्द म्हणतात,

> “न जटाही न गोत्तेन न जच्चा होति ब्राम्हणो !!
> यम्हि सच्चं च धम्मो च सो सुची सो च ब्राम्हणो!!”

जन्माने कुणही ब्राम्हण होत नाही किंवा गोत्रोणे नाहितर केस वाढविल्याने तर ज्यामध्ये पवित्रता, सत्य, जो जिवनात धर्माचे आचरण करतो तोच ब्राम्हण आहे.

कबीर म्हणतात,

> “न्हाये धोये क्या भया, जो मन का मैल न जाय !
> मीन सदा जल मे रहे, धोये बास न जाय !!
> वैष्णव भया तो क्या भया, बूझा नही विवके !
> छप्प तिलक बनाय कर, दग्ध्या लोक अनेक !!”

धार्मिक परंपरा रूढी यांनी त्यांनी विरोध केला चित्त शुध्दी वर त्यांनी जोर दिला. भगवान बध्दानी उपदेश लोकभाषेत दिला वैदीक भाषेला त्यांनी विरोध केला. कबीरांनी सुध्दा संस्कृत भाषेला विरोध केला त्यांचे मत होते की, संस्कृत भाषा शिकल्यामुळे कुणी ज्ञानवंत होउ शकत नाही.

> “संसकीरत भाषा पढि लीना, ज्ञानलोक कहोरी !
> आसा तृस्ना में बहि गयो सजनी, काम के ताप सहोरी !!”

भगवान बुध्द तसेच संत कबीर यांचे जेव्हा आपण अध्ययन करतो तेव्हा दोघांच्या व्यक्तीमहत्वात साम्य आढळुन येते. दोघांचे विचारांचा जन्म विषमतेमुळे झालेला आहे. दोघांनी आपले ज्ञान लोकभाषेत व्यक्त केले. दोघांनी हिंसा व उॅच निच तेचा विरोध केला. दाघांनी कथनी व करनी यांना महत्व दिले.

कबीरांनी सत्तनाम शब्दाचा वापर केला. हास सत्तनाम शब्द पाली भाषेतिल सच्चनाम चे रूपांतर आहे. पालीभाषेत सच्चनामाचा वापर भगवान बुध्दी केला आहे. अंगुत्तरनिकाय च्या चार सुत्रात अनेक वेळा

"सच्चनाम या शब्दाला उच्चारलेले आहे.
इच्चेते अठठधम्मा सध्दस घरमेसिनो !
अक्खा सच्चनामेन अभयत्थ सखाहवा !!"
याचा अर्थ सच्चनाम नी दोन्ही लोकाकरीता सुखदाय म्हटले आहे.

मज्मिनियामधील इसिगील सुत्त मधे सत्यनाम हा शब्द पहायला मिळतो.

भगवान बुध्द समानतेला स्थान देतात. त्यांचा संघ समानतेवर आधारीत होता. त्यावरूनच संत तुलसीदास माणसामाणसात कोणताच भेदभाव करीत नव्हते. सर्वात एक तत्वाचे निवास आहे. कुणी मोठा तर कुणी छोटा नाही. कवी ब्राम्हण व शद्राना समोर ठेवुन समानता प्रस्थापीत करीत आहे. ब्राम्हण श्रेष्ठ आहे याबाब विरोध करतो.

"यह क्यों शूद्र जु  सह क्यों पॉडे !
एक ही माटी के सब भॉडे !
एक ही चका एक ही गारा !
एक कुलाल उपावन हारा ! "

संत दरिया साहब ब्राम्हणांच्या प्रति आक्रमक होते. त्यांची श्रेष्टता ते सतत खंडीत करीत होते.

"सकल जीव कहं कहै बुझाई ! पंडित के घर सोच न आई !
अपने ब्रम्हान बिस्नौ होई ! घर मे साकठ मेहरी सोई !
मासु खाये संग सुतै जाई ! ताके मुख चुम्बन गहि लाई !
कहत फिरे हम बडा कुलीना ! घरवा में तुरकिनी नही चिना !! "

गुरू नानक  बुध्दाच्या विचारापासुन प्रभावित होते. निराकार, निरंजन, अलख तसेच सर्वव्यापी नानक सत्यनाम वाले गुणगाण करीत होते. कबीरांचे तसेच बुध्दाचे गुणगाण करीत होते.

गुरू नानक म्हणतात,

"पडि पडि पंडित वादु बखाणे !
भीतरी होदि वसतु न जाणे ! "

अर्थात वाचुन वाचुन पंडित मतांचे व्याख्यान करतो परंतु आपल्या आतमधील आत्म्याला पाहत नाही. सिध्द सरपाह जे ८ व्या शतकात होउन गेले ते सुध्दा बुध्दाचे गुणगाण करीत होते.

“पंडिअ सअल सत्थ वक्खाणअ !
देहहिं बुध्द वसन्त ण जाणआ !! ”

अर्थात पंडीत सर्व शास्त्राचे व्याख्यान करतो परंतु तो आपल्या आतमधील बुध्द गुणाला जाणत नाही.

बुध्द म्हणतात,

“जाती मा पुच्छ चरणं पुच्छ याचा अर्थ जात विचारू नका, आचरण विचारा.

कबीर म्हणतात,

जाती ना पुछो साध की पुछ लो ज्ञान.”

भगवान बुध्द म्हणतात, सोपाक चांडाला मातंग श्रषी होवु शकतो.जाती भेदाला विरोध करून कुणी आईच्या पोटी जन्माला आल्यामुळे ब्राम्हण होवु शकत नाही. अश्वलायन या ब्राम्हणासोबत ते चर्चा करतात. ब्राम्हण महिला रूतीमती होतात, प्रसवतात, मुलांना दुध पाजतात, आपल्या योनीतुन मुलांना जन्म देतात. यामुळेच ब्राम्हण श्रेष्ट होत नाही तर शुद महिला सुध्दा रूतीमती होतात, प्रसवतात, मुलांना दुध पाजतात, आपल्या योनीतुन मुलांना जन्म देतात तर ते श्रेष्ट होत नाही का.

सिध्द सरहपा म्हणतात,

“ब्राम्हण ब्रम्ह देवाच्या मुखातुन जन्म घेतात.
मग इतर जन्म घेवु शकत नाही काय. ”

बौध्द धम्मात जातीभेदाला स्थान नाही. जो व्यक्ती प्रवज्वीत होतो, तो आपली जात, गोत्र सोडुन शाक्यपुत्र श्रमण म्हणुन ओळखला जातो. उदान मध्ये म्हटलेले आहे, भिक्षुंनो जेवढया काही मोठमोठया नद्या आहेत जसे गंगा, यमुना, अचिरवती, मही सर्व समुद्राला जावुन मिळतात. तेव्हा आपला प्रदेश, नांव सोडुन देतात. व महासमुद्र म्हणुन ओळखल्या जातात. त्याचप्रमाणे क्षत्रिय, वैश्य, ब्राम्हण, शुद्र चारही वर्णामधील लोक आपला वर्ण सोडुन श्रमण म्हणुन ओळखले जातात.

भगवान बुध्दानी वेदाला प्रामाण्य मानले नाही. त्यांनी म्हटले की, एखादी बाब ग्रंथात लिहलेली आहे म्हणुन तिला खरे मानु नका. तर त्यांनी मुर्खाची पाच लक्षणे सांगितलेली आहेत. संसार कुणीतरी निर्माण केला आहे हे मानने, स्नान केल्याने पुण्य मिळते, आपल्या जातीचा जो अभिमान बाळगतो, पाप धुवुन काढण्यासाठी जो शरीराला कष्ट देतो.

कबीर म्हणतात,

“वेद आणि कुराण परमतत्वाला जाणत नाहीत. वेद कत्तेब की गम्म नही !

कबीर पढीबा दूरि करि, पुस्तक देह बहाई. क्योकी, पोथी पढि जग मुवा पण्डित भया न कोइ.”

धम्मपदात भगवान बुध्द म्हणतात, अनेक ग्रंथाचे वाचन करून जर त्यानुसार आचरण केले नाही तर

तो व्यक्ती दुस—यांच्या गायी मोजणाराच असतो. तो श्रामण्याचा अधिकारी नसतो. याला अनुसरूनच सिध्द सरहपा म्हणतात,

"पण्डित सअल सत्य वक्खाण्इ !
छेहहिं बुध्द बसन्त न जाणइ !! "

संतानी कर्मकांड व वेद यावर बहिष्कार केला. संत तुलसीदास म्हणतात,

"कहॉं विविध व्सयाकरण पढे रे, का पढे वेद पुरान !
तनम न कौ म लना मिटै, बिना भजे भगवान !! "

दारिया साहेब म्हणतातत्र, सुमिरू नाम चित्र गहि सोई ! बेद पढे का पंडित होई!

"सास्तर गीता ग्यान अरथावै ! जीव के दया दरद नहिं आवै !! "

यावरून हे स्पष्ट आहे की, संत वेदाचे खंडन करतात,. पंजाब चे वाहे गुरू सेन साहेब यांनी सुध्दा शास्त्रांना मान्यता दिली नाही. त्यांना खोटे म्हटले.

"वेदही झुटा , शास्त्रहि झूठा
भक्त कहॉं से पछानी !
ज्या,ज्या ब्रम्हा तू हि झूठा,
झूठी साके न मानी !! "

संत शिवनारायण यांनी सुध्दा वेद पुराणांला प्रामाण्य मानले नाहीतर गौतम बुध्दाप्रमाणे हे ग्रथ म्हणजे भटकवणारे साधने आहेत. ते म्हणतात,

"वेद पुराण बरन बहु बरनन, भिन्न भिन्न करि भाग !
सोसु भूले मूरख गवारा, भटकत किरहि जग भालि भतियारा"

गुरू नानक सुध्दा ग्रंथाना प्रामाण्य मानत नाहित तर ते त्यांच्या विरोधी होते. केवळ ग्रंथ वाचुन ज्ञान लोकांना सांगणे यामुळे ज्ञान प्राप्ती होत नाही तर ते आध्यात्मिक दृष्टीकोनातुन ओळखणे महत्वाचे आहे.

"पडि पडि पंडित बादु बखाणै !
भीतरी होदी वसतु न जाणै !! "

केवळ ग्रंथाचे पढन करून आसक्ती सुटन नाही ग्रंथ खोटे आहेत पुर्ण संसारात ते आपल्याला भटकवतात.

"वेद पढै पढि वादु वखाणै !
ब्रम्ह सिनु महेसा !
एह त्रिगुण माइआ जिनु जगत भुलाइआ !
जनम मरण का सहसा ! " गुरू अमरदास

संत कवी यांचे मत असे होती की मुर्तीपुजा कर्मकांड भक्ती मधील अडथळे आहेत. व पुर्ण समाजाला ब्राम्हणांनी यांमध्ये गुंतुन ठेवलेले आहे. संत देवळात जाणे व्यर्थ समजत होते. ही परंपरा नामदेव यांनी सुरूवात केली. ते म्हणतात,

"कीस हू पुजू दुजा नजर ना आई
एक पाथर किज्जे भाव! दूजे पाथर धरीये पास! "

जर दगड देव असेल तर आम्ही सुध्दा देव आहोत.

भगवान बुध्दानी महामंगल सुत्तात आई वडीलांची सेवा केल्यामुळे आपले मंगल होते. यावरूनच संत शिवनारायण यांनी सुध्दा आई वडीलांच्या सेवेला महत्व दिलेले आहे.ते म्हणतात,

"सपाई मन दूर खलन मत जैइया
घट में गंगा,घट में यमुना, तोहि बिच पैठि नहियो !
अछे हरे बिरछ की शीतल जूड छहिया तेहि तरे बैठि नहियो
माता पिता तेरे घट ही में, नित उठ दर्शन पईयो !! "

भगवान बुध्द त्यांनाच आर्य समजत होते जे जिवहिंसा करीत नव्हते किंवा दुस—याला प्रोत्साहित करीत नव्हते. प्राचीन काळात अहिंसा परम धर्म मानला जात होता. हिंसेला पाप म्हटले जात होते. संतानी मात्र अहिंसेचा उपदेश केला.

संत गरीबदास गरीब मुल्ला ला अहिंसेचा उपदेश करतात.

"दिल ही अन्दर हुजरा काही दिल ही अन्दर हुजरा
कल ले, उस साहब से मुजरा !
मका मदीना दिल ही अन्दर, काबे कै कुरबाना !!
काहे लेट निजाम करत हो, खोजो तन आस्थाना
हक हक करके मुल्ला बोलै काजी पढे कुराना !!
जिन कूॅ वह दीदार कहॉ है, काटै गला बिराना !! "

संत दादु जिवहिंसा रोकने के लिए कहते है,

"मास आहारी मद पीवै, विषै विकारी सोई !
दादु आतम राम बिन, दया कहॉ थै होई !!
आपन को मारै नहि ! पर को मारन जाहि !
दादू आपा माहै बिना, कैसे मिलै खुदाय !! "

काटा पायात रूतल्यानंतर वेदना होतात परंतु मुर्ख माणसे मात्र प्राण्याची मुंडके कापतात तेव्हा त्यांच्या वेदनेकडे त्यांचे जराही ध्यान जात नाही.

**निष्कर्ष :**

वरील संदर्भावरून असे निदर्शनास येते की, मध्ययुगात बौध्द धम्माचे अस्तित्व नव्हते परंतु जी भगवान बध्दाची शिकवण इ.स. १२ व्या शतकापर्यत संपुर्ण भारतात पसरलेली होती त्याचाच एक परिपाक म्हणजे कुठे ना कुठे तरी ती जिवंत होती हे आपल्याला पहावयास मिळते. व त्याचा प्रभाव भारतातमधील संतावर होतो असे निष्कार्षाअंती आढळुन येते.

**संदर्भ सुची :**


- संत मतावर बौध्द धर्माचा प्रभाव –एस.एस. गौतम, सिध्दार्थ बुक पब्लिकेशन दिल्ली
- संत नामदेव – डॉ. प्रभाकर माचवे – ग्लोबल पब्लिकेशन, दिल्ली
- रहिम ग्रंथावली – संपादक विद्यानिवास मिश्र – गोंविंद रजनीश ग्लोबल पब्लिकेशन भोपाळ
- महाराष्टाचे संत व त्यांची हिंदी वाणी – डॉ विनय मोहन शर्मा अरिहंत पब्लिकेशन मुंबई
- हमारे मुस्लीम संत – कृ. गो. वानखडे गुरूजी सिंहल प्रकाशन, भोपाळ
- गुरू नानक – व्यक्ती और संदेश डॉ. हजारी प्रसाद व्दिवेदी सम्यक प्रकाशन मुंबई.